निशाणी ४४

# नेवासा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब, सि.डि.

रे.मु.नं. यांचे कोर्टात

१३१५/२०२१

**वादी**

तुकाराम मनाजी पेहेरे

**प्रतिवादी**

पंढरीनाथ मनाजी पेहेरे, वगैरे

**याकामी वादीचे सरतपासणीचे शपथपत्र असे ते खालीलप्रमाणे -**

**याकामी मी तुकाराम मनाजी पेहेरे, वय-७०, धंदा-शेती, रा.भेंडे, ता.नेवासा, जि. अहमदनगर सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,**

१) सदरचा दावा मी प्रतिवादीविरुध्द मौजे रांजणगाव, ता.नेवासा, जि.अ.नगर येथील गट नं.३४८/१, क्षेत्र १ हे.७१ आर, आकार ० रु.६५ पैसे व गट नं.३४८/२, क्षेत्र १ हे.१२ आर, आकार ० रु.४५ यासी चतुर्सिमा पुर्व- गट नं.३५०, दक्षिण- रस्ता व गट नं.३७५, पश्चिम - गट नं.३४७ व उत्तर - गट नं.३३९ या दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटपासाठी, जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

२) मी व प्र.वादी नं.१ ते ३ हे सख्खे भाऊ असून प्र.वादी नं.४ ही आमची बहिण आहे. येणेप्रमाणे माझी व प्रतिवादी न.१ ते ४ यांची वंशावळ असे. माझे व प्र.वादी नं.१ ते ४ यांचे वडील मनाजी व आई नानीबाई हे आईवडील असुन ते मयत झालेले आहेत. तसेच मला व प्रतिवादी नं.१ ते ४ यांना आणखी एक भाऊ गोपिनाथ मनाजी पेहेरे हा होता, तो मयत झालेला आहे. दावा मिळकत

Order
Read and record.

SUNIL NAGORAO BHOSLE

Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2025.11.15 17:08:11 +0530

CJSD NEWASA

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर
नेवासा

ही माझे व प्र.वादी नं.१ ते ४ आमचा मयत भाऊ गोपीनाथ मनाजी यांचे नावे आमचे वडील मनाजी हे दि.११/०८/१९८० रोजी मयत झाले. त्यांचे मृत्युनंतर सदरची मिळकत ही फेरफार नं.३१८ अन्वये आमची नावे वारसाहक्काने आलेली आहे. त्यामुळे सदरची मिळकत ही एकत्र हिंदू कुटूंबाची वडिलोपार्जित मिळकत आहे. माझे व प्रतिवादी नं.१ ते ४ व आमचा मयत भाऊ गोपिनाथ यांचे दरम्यान दावा मिळकतीचे अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही. दावा मिळकतीमध्ये माझा अविभक्त हिस्सा होता व आहे. मी व प्र.वादी नं.१ ते ४ व मयत गोपिनाथ हे एकत्रातच मनाजीचे मृत्युनंतर दावा मिळकतीची मेहनत, मशागत करुन उत्पन्न, उपभोग घेत होते. व दावा मिळकतीचे अद्यापपावेतो कधीही माझे व प्रतिवादी नं.१ ते ४ व आमचा मयत भाऊ गोपिनाथ याचे दरम्यान स्वतंत्र हिस्से होवून दावा मिळकतीचे वाटप झालेले नव्हते व नाही.

३) दरम्यानचे काळामध्ये प्र.वादी नं.१ पंढरीनाथ मनाजी पेहेरे हे एकत्र हिंदु कुटूंबाचा कर्ता म्हणून सर्व आर्थिक व्यवहार पाहत असत. मी एकत्र कुटूंबाचा उदरनिर्वाह शेती उत्पन्नातुन होत नसल्यामुळे बाहेरगावी कामानिमित्त भेंडे येथे गेलो. असे असतांना प्रतिवादी नं.१ याने बेकायदेशिररित्या दावा मिळकतीपैकी काही हिस्सा बेकायदेशिररित्या कोणतेही वाटप झालेले नसतांना माझे अपरोक्ष माझी कुठलीही संमती, सही न घेता, मला कोणतीही कल्पना न देता कामगार तलाठी यांना हाताशी धरुन फेरफार नं.९७२ हा खोटा बनावट तयार करुन २/५ हिस्सा त्या खोटया बनावट, बोगस फेरच्या आधारे स्वत:चे नावे करुन घेतला.

४) तसेच माझे व प्रतिवादी नं.१ ते ४ व मयत गोपिनाथ यांचे कुटूंबाचे दरम्यान कुठेलही वाटप होवून हिस्से ठरलेले नसतांना प्रतिवादी नं.२ याने व मयत भाऊ गोपिनाथ मनाजी पेहेरे यांनी प्रतिवादी नं.५ यांना दि.०४/०२/२००२ रोजी

अधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर
नेवासा

बेकायदेशिररित्या स्वत:चे फायद्याकरीता खरेदीखत दस्त क्रं.४२०/२००२ चा बोगस, बिनकब्जाचा, पोकळीस्त असा गट नं.३४८ पैकी १ हे.१२ आर क्षेत्राचा दस्त करुन दिला व त्याआधारे फेरफार नं.२१३७ अन्वये गट नं.३४८ चे १ व २ असे दोन ७/१२ उतारे तयार करण्याचा कुठलाही कायदेशिर अधिकार गाव कामगार तलाठी यांना नसतांना देखील गटाचे दोन ७/१२ तयार करुन दोन बेकायदेशिर हिस्से केलेले आहेत. व त्याप्रमाणे प्रतिवादी नं.५ यांनी स्वत:चे नावाची नोंद गावचे रेकॉर्ड ऑफ राईटला बेकायदेशिररित्या करुन घेतली. व त्या बेकायदेशिर नोंदीच्या आधारे प्रतिवादी नं.५ यांनी प्रतिवादी नं.६ यांना विक्री केले. त्यानंतर प्रतिवादी नं.६ यांनी ५६ आर क्षेत्र प्रतिवादी नं.७ यांना विक्री केलेले आहे.

५) अश्याप्रकारे माझे व प्रतिवादी नं.१ ते ४ व मयत गोपिनाथ यांचे कुटूंबाचे दरम्यान कुठेलही वाटप होवून हिस्से ठरलेले नसतांना देखील बेकायेदशिररित्या माझा अविभक्त हिस्सा बुडविण्याच्या उद्देशाने सदरचे व्यवहार झालेले आहेत. सदरचे व्यवहाराबाबत मला आजपावेतो कोणतीही कल्पना नव्हती व नाही. सदर खरेदीखताचे व्यवहारचा फायदा हा मला यांना झालेला नाही.

६) असे असतांना मी ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रतिवादी नं.१ यांचेकडे जावून सदर मिळकतीबाबतीचे आपण वाटप करुन घेवू, ज्याचे-त्यांचे हिस्से ज्याचे-त्याचे नावावर करुन घेवू अशी मागणी केली असता. प्र.वादी नं.१ यांनी मला उडवाउडवीची उत्तरे दिली व म्हणला की, "तुला कसली जमिन वाटून द्यायची, तुला वाटून द्यायला जमिन राहिलेली नाही. " असे म्हणून मला शिवीगाळ करुन हाकलून दिले. त्यानंतर मी प्रतिवादी नं.४ यांचेकडे जावून त्यांचे हिश्याचे जमिन वाटून प्र.वादी नं.१ ला द्यायला सांग अशी मागणी केली असता त्यांनी सांगितले की, "तुम्ही चार भाऊ असुन तुमचा जमिनीचा वाद तुम्हीच मिटवा."

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर
नेवासा

त्यानंतर पुन्हा मी नातेवाईकामार्फत प्रतिवादी नं.१ यास समजावून सांगून हिस्सा वाटून मागण्याचा प्रयत्न केला असता त्यास यश आले नाही. त्यानंतर मी संपुर्ण गटाचे ७/१२ उतारे, फेरफार, खरेदीखताचे दस्त काढले असता फेरफार नं.९७२ अन्वये प्र.वादी नं.१ यांनी दावा मिळकती पैकी २/५ हिस्सा स्वत:चे नावे बेकायदेशिररित्या करुन घेतल्याचे रेकॉर्डवरुन समजले. तसेच प्रतिवादी नं.२ व मयत गोपिनाथ यांनी सदर मिळकत ही प्रतिवादी नं.५ हीस विक्री केल्याचे माहिती समजली. तेंव्हा मला माझी फसवणुक झालेली आहे याची प्रथमच जाणीव व माहिती झाली. त्यामुळे मी या माननीय कोर्टात स्वत:चे न्याय हक्कासाठी सदरचा दावा वाटपासाठी, जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

७) सदर दाव्यात प्रतिवादीं यांनी दाव्यात हजर होवून जी कैफियत दाखल केलेली आहे, ती खोटी व बनावट असुन ती मला मान्य नाही, कबूल नाही.

८) मी वर्णनयादीने दाखल केलेली सर्व कागदपत्रे खरी व बरोबर असुन त्यांना पुराव्याचे कामी वाचण्यात येवून, निशाणी नंबर देण्यात यावा.

९) माझी विनंती की, माझा दावा मिळकतीमध्ये असलेला अविभक्त १/६ हिस्सा अगर मे.कोर्ट ठरवील तो हिस्सा मला सरस निरस मानाने वाटप करुन, पृथक करुन प्रत्यक्ष कब्जात देववावा. प्र.वादी नं.२ व मयत गोपीनाथ मनाजी पेहेरे यांनी प्र.वादी नं.५ यांना दि.०४/०२/२००२ रोजी करुन दिलेला खरेदीखताचा दस्त क्र.४२०/२००२ हा बेकायदेशीर, पोकळीस्त व बिनकब्जाचा असल्याने सदरचा दस्त हा माझे हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होऊन मिळावा. प्रतिवादी नं.१ यांनी दावा मिळकत ३४८ पैकी २/५ हिस्सा हा फेरफार नं.९७२ अन्वये बेकायदेशिररित्या स्वत:चे नावे करुन घेतलेला आहे असा

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर
नेवासा

जाहिर ठराव होवून मिळावा. तसेच खरेदीखत दस्त क्रं.४२०/२००२ चे अन्वये प्र.वादी नं.५, ६ व ७ यांचे दरम्यान झालेले व्यवहार माझे हिस्सेवर बंधनकारक नाहीत असा जाहिर ठराव होवून मिळावा. प्रतिवादी नं.१, ६ व ७ यांचे नावे असलेल्या ७/१२ रेकॉर्ड ऑफ राईटच्या आधारे गैरफायदा घेवून दावा मिळकत तिऱ्हाईत इसमांना हस्तांतरीत करु नये अगर कर्ज बोजे निर्माण करु नये. दाव्याचा खर्च मला प्र.वादींकडून देववावा. इतर योग्य ते न्यायाचे हुकुम माझे लाभात व्हावेत.

येणेप्रमाणे सरतपासणीचे शपथपत्र असे.

नेवासा 15/11/2025

दिनांक :- १५/११/२०२५

ऑफिडेव्हिट करणार

ओळख

(ॲड.एस.बी.लवांडे)

याकामी मी तुकाराम मनाजी पेहेरे, वय-७०, धंदा-शेती, रा.भेंडे, ता.नेवासा, जि.अहमदनगर सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर नमुद केलेला संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी आजरोजी माझी सही या लेखाखाली केली आहे.

नेवासा 15/11/2025

दिनांक :- १५/११/२०२५

ऑफिडेव्हिट करणार

Solemnly Affirmed before me
by Tukaram Manaji Pehre · Age 70 Occ Agriculture R/o Bhende
who is identified before me
by Adv S.B. Lawande. Tal-Newasa Dist-A.nagar
to whom I personally know.
Id. No XXXX XXXX 6541

Superintendent
Civil Court S.D Newasa